# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

'वनभवन', रामगिरी मार्ग, पोलीस जिमखान्याच्या शेजारी, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१

☏ ०७१२-२५५५६७५, २५५६९४४ Fax no. ०७१२-२५५०६७५ Email Id : apccfcon@mahaforest.gov.in / ccfcon@gmail.com


क्र. कक्ष-१२/जमिन/३/कोल्हापूर/प्र.क्र.३१३(१३-१४)/ 433 /१४-१५
नागपूर : ४४० ००१, दि- 9/9/14

प्रति,

प्रधान सचिव (वने)
महसूल व वनविभाग
मंत्रालय, **मुंबई-३२**

मुख्य वनसंरक्षक, (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय. ४१६ ००३.
आवक क्र. २८००
दिनांक : 16 SEP 2014
कक्ष क्रमांक ५/५१०८
स्वाक्षरी

**विषय** : जमिन रत्नागिरी
मौजे कळंबणी बु. वाळंजवाडी ता. खेड, जि. रत्नागिरी येथील देवरहाटीच्या जागेत मंदिराला लागून सभा मंडप बांधण्यास परवानगी मिळणेबाबत....श्री. गणपत पांडूरंग येसरे

**संदर्भ** :
१. शासन, महसूल व वनविभाग पत्र क्र. एफएलडी-१४/२०१३/अनौ.६०/ प्र.क्र.४६०/फ-३, दिनांक २०/०९/२०१३
२. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर पत्र क्र. कक्ष-२/तांस/जमीन/१३-१४/१५७३, दिनांक २५/०३/२०१४.
३. विभागीय वन अधिकारी, चिपळून यांचे पत्र क्र. ब/सर्व्हे/ना.दा./१३८८, दिनांक २५/०२/२०१४.
४. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर पत्र क्र. ब/कक्ष-५/तांस/सर्व्हे/२०१४-१५/५६२, दिनांक १२/०८/२०१४.

संदर्भित पत्रांचे कृपया अवलोकन व्हावे. सदर प्रकरणी शासन पत्र संदर्भ १ चे अनुषंगाने आवश्यक अहवाल संदर्भ २ ते ४ अन्वये या कार्यालयास प्राप्त झाला आहे. सदर अहवालाचे आधारे या कार्यालयाचा मुद्देनिहाय अहवाल खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**मुद्दा क्र. १** :- विचाराधीन क्षेत्राचा वैधानिक दर्जा वन आहे किंवा कसे?

**उत्तर** :- मौजे वाळंजवाडी ता. खेड जि. रत्नागिरी येथील स.क्र. ४४ क्षेत्र ०.५१ हे.आर. हे वन विभागाचे मालकीचे नसून सदर क्षेत्राचा दर्जा वन नाही.

**मुद्दा क्र. २** :- विचाराधीन क्षेत्राचा दर्जा वनसंज्ञा, मॅग्रोव्ह, झुडपी आहे किंवा कसे?

**उत्तर** :- वनविभागाकडील अभिलेखानुसार प्रश्नांकित क्षेत्र वनसंज्ञा, मॅग्रोव्ह, झुडपी यामध्ये मोडत नाही.

**मुद्दा क्र. ३** :- विचाराधीन क्षेत्रास वन (संवर्धन) अधिनियम १९८० किंवा वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ च्या तरतूदी आकृष्ठ होतात अगर कसे?

**उत्तर** :- प्रश्नांकित क्षेत्राचा वैधानिक दर्जा वन नसल्याने त्यास वन (संवर्धन) अधिनियम १९८० च्या तरतूदी आकृष्ठ होत नाहीत. तसेच सदर क्षेत्राचा समावेश संरक्षित क्षेत्रात होत नसल्याने या क्षेत्रास वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ च्या तरतूदी लागू होत नाहीत.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण)
महाराष्ट्र राज्य, नागपूर

**प्रतिलिपी** : मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर यांना माहितीकरीता अग्रेषित.

**प्रतिलिपी** : विभागीय वन अधिकारी, चिपळून यांना माहितीकरीता अग्रेषित.

# विभागिय वन अधिकारी चिपळुण यांचे कार्यालय.

फोन व फॅक्स ०२३५५-२५२८०४ ईमेल·forestcpn @ sancharnet.in


जा.क्र.ब/सर्व्हे/ना.दा./६८६/१४-१५
चिपळुण दिनांक-२९/१०/२०१४.

प्रति,

मा.मुख्य वनसंरक्षक (प्रा)
कोल्हापुर.

विषय :- मौजे-कळंबणी बु. वाळंजवाडी ता. खेड जि.रत्नागिरी येथील देवराटीच्या जागेत मंदीराला लागुन सभा मंडप बांधण्यास परवानगी मिळणे बाबत.

संदर्भ :- आपले कडील पत्र क्र.ब/कक्ष-५/जमीन/३८३४/१४-१५ दिनांक-१६/१०/२०१४.

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भीय पत्रान्वये मागणी केलेले मौजे-कळंबणी बु. वाळंजवाडी ता. खेड जि.रत्नागिरी येथील देवराठी स.क्र.४४/० क्षेत्राचे ७/१२ अभिलेख व नकाशा पुढील कार्यवाहीसाठी सोबत सादर केले आहेत. वनक्षेत्रपाल दापोली यांना ग्रामपंचायत, मौजे-कळंबणी बु. वाळंजवाडी ता. खेड येथे नोटीस देवुन, सदर जागे बाबत काही तक्रारी/हरकती असलेस त्या प्राप्त करुन या कार्यालयास सादर करणे बाबत कळविणेत येत आहे. सदर जागे बाबत काही तक्रारी/हरकती असलेस, त्या आपणास कळविणेची तजवीत ठेवीत आहोत.

सोबत- वरील प्रमाणे.

(ए.एम.साबळे)
विभागीय वनअधिकारी
चिपळुण.

प्रतिलिपी :- परिक्षेत्र वन अधिकारी दापोली यांना,
/- ग्रामपंचायत, मौजे-कळंबणी बु. वाळंजवाडी ता. खेड यांना उपरोक्त विषयात नमुद कामा बाबत कळवुन त्यांच्या काही तक्रारी/हरकती असलेस त्या प्राप्त करुन,त्वरीत या कार्यालयास सादर कराव्यात.

मुख्य वनसंरक्षक, (प्रादेशिक) कोल्हापूर
यांचे कार्यालय. ४१६ ००३.
आवक क्र.........
दिनांक : 30 OCT 2014
कक्ष क्रमांक.......
स्वाक्षरी